# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क. ४१९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—१७/०७/२०१६.

**१) कापड व रिचार्ज दुकानातुन साहित्य व नगदी पैश्याची चोरी. :—**

दिनांक १५/०७/२०१६ रोजी २१.०० ते दि. १६/०७/२०१६ रोजी ०७.३० वा. दरम्यान कोणीतरी अज्ञात आरोपीने रात्र दरम्यान फिर्यादी रूपेश शामदेव आतीलकर वय ३५ वर्ष, रा. पिंडकेपार यांचे गणेशपुर मेन रोड भंडारा येथील वैष्णवी कापड दुकान व मोबाईल रिचार्ज या दुकानाच्या शटर्सचा ताला लोखंडी रॉडने तोडुन आत प्रवेश केला व दुकानातील १ डेल कंपनीचा जुना वापरात असलेला लॅपटॉप, वेगवेगळया कंपनीचे मोबाईल रिचार्ज कार्ड, एक्सल साईज शर्ट १५ नग, जिन्स पॅन्ट १५ नग व नगदी अंदाजे २,०००/—रु. असा एकुण कि. ३४,०००/—रु. चा माल चोरून नेला. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४६१,४५७ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंडे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) शेतातील जाण्या—येण्याच्या रस्त्याच्या कारणावरून शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिली. :—**

दिनांक १५/०७/०१६ रोजी ०७.०० वा. दरम्यान फिर्यादी शिवचरण रघुनाथ कापगते वय ५० वर्ष, रा. सालई यांना आरोपीच्या शेतातील शिव धु—याने हंगामी जाणे करीता मा. तहसिलदार साकोली यांचे आदेश असतांना सुध्दा आदेशास मनाई करून चारही आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीला ''तुझा आमच्या शेताच्या शिवधु—याने जाण्या—येण्याचा रस्ता नाही.'' असे बोलुन अडवुन शिवीगाळ केली व जिवाने मारण्याची धमकी दिली. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३४१,१८८,५०४,५०६,३४ भादंवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परशुरामकर पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) कवेलु फोडण्याच्या कारणावरून मारहान करून जखमी केले. :—**

दिनांक १५/०७/०१६ रोजी २१.३० वा. दरम्यान आलम भगवान खोब्रागडे वय ४४ वर्ष रा. संगम पुनर्वसन मुजबी व आरोपी हे एकमेकांच्या घराच्या शेजारी राहतात. तिन्ही आरोपीतांनी संगनमत करून आलम भगवान खोब्रागडे यांच्या घराचे कवेलु फोडत असतांना त्यांनी आरोपींना ''कवेलु कशाला फोडता'' असे बोलल्यावरून आरोपीतांनी भांडण करून आलम भगवान खोब्रागडे यांना काठीने पाठीवर, पोटावर व उजव्या हातावर मारहाण करून जबर दुखापत केली. असे जखमीचे बयाण व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२६,३४ भादंवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कावळे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) अवैध दारू अडयांवर धाडी. :—**

दिनांक १६/०७/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. जवाहरनगर, आंधळगाव, गोबरवाही व पवनी येथील परीसरातील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४५ लिटर हातभट्टी दारू कि. २,३००/—रू. व ९०० मिली. देशी दारू कि. २५०/—रू. असा एकुण कि. २,५५०/—रू. चा माल जप्त करण्यात आला.

पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करिता.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.